<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>

**१७.** माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल आहे याची मला माहिती आहे. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र वाचले आहे. त्यातील मजकूर मला माहिती आहे. आजरोजी माझा उलटतपास होत आहे याची मला कल्पना आहे. मी माझा सरतपास व उलटतपास विरोधी पक्षकारांसाठी नोंदवित आहे. सदर दाव्यातील विरोधी पक्षकार म्हणजे मकरंद शांताराम टाक्कर व विनोद शांताराम टाक्कर होय. सदर दाव्यामध्ये एकूण वादी पाच आहेत. सदर दाव्यातील इतर वादींनी दाव्याचे कामकाज चालविण्यासाठी माझ्या नावे प्रतिज्ञापत्र लिहून दिले आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र मी दाव्याच्याकामी हजर केले आहे. मी एकूण तीन प्रतिज्ञापत्र दाव्याच्याकामी हजर केली आहेत. प्रतिज्ञापत्रांव्यतिरिक्त अन्य कोणताही कागद मला लिहून दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र. २ ते ५ यांच्या तर्फे दाव्याचे कामकाज चालविण्याचे अधिकार मला नाहीत. वादी क्र. २ ते ५ यांच्याकडून मी दाव्यासंदर्भात माहिती घेतलेली आहे. मी दाव्याबाबतची माहिती दावा दाखल करण्यापुर्वी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की दावाविषयक जमिनीबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात दावा मिळकत हा शब्द वाचलेला आहे. दावा मिळकत हा शब्द सर्वे क्र. ६ हिस्सा क्र. ३ याबाबत वापरण्यात आला आहे. हे म्हणणे खरे नाही की सर्वे क्र. ६ हिस्सा क्र. ३ चे संपूर्ण क्षेत्र मी सांगू शकत नाही. सर्वे क्र. ६ हिस्सा क्र. ३ चे संपूर्ण क्षेत्र १५.४ आहे. मी सर्वे क्र. ६ हिस्सा क्र. ३ चा सातबारा उतारा पाहिलेला आहे. एकूण क्षेत्रापैकी १२.५ हे लागवडीलायक क्षेत्र असून २.९ क्षेत्र हे पोटखराबा आहे. वरील सांगितलेले सर्व क्षेत्र हे गुंठे या परिमाणात आहे. सातबारामध्ये गुंठा हा शब्द नाही. सातबाऱ्यामध्ये परिमाणाबाबत हेक्टर असा शब्द आहे. वरील उल्लेखीत सर्व क्षेत्र हे हेक्टर नाहीत. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीचे क्षेत्र हे मला सातबाराच्या परिभाषेत सांगता येणार नाही. दावा मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र १५.४ गुंठे इतके आहे. १ हेक्टर म्हणजे किती जमीन हे मी सांगू शकत नाही. १ गुंठा म्हणजे ३३ फूट लांब व ३३ फूट रुंद एवढे क्षेत्र होय.

**१८.** मी वाद मिळकतीचा नकाशा पाहिलेला आहे. सन १९९० साली तो मी पाहिलेला आहे. सर्वे क्र. ६ चा जुना सर्वे क्र. ७३८ असा आहे. मी दावा मिळकतीचा नकाशा

माझ्या घरी पाहिलेला आहे. तो नकाशा मी दाव्याच्या कामी हजर केलेला नाही. मी जो दावा मिळकतीचा नकाशा पाहिला ती छायाकिंत प्रत होती. सन १९९० साली माझे वय अंदाजे १५ वर्षे होते. ती प्रत मी मिळविलेली नव्हती. त्या नकाशाच्या आधारे मी सदरचा दावा दाखल केला आहे असे माझे म्हणणे नाही. दावा मिळकतीच्या या नकाशा व्यतिरिक्त अन्य नकाशा दावा दाखल करण्यापुर्वी माझ्या पाहण्यात आला नाही. तो नकाशा मी दाव्याच्या कामी हजर केलेला आहे.

**(प्रतिवादींच्या विधीज्ञाच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब. )**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
(के.के.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक- ०९/१२/२०२२.